**नि.दि.दा.क्र.५७०/२०२१ मधील**
**निशाणी क्र.२८ वर आदेश**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी त्यांचे म्हणणे/कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांना कोव्हीडमुळे वेळेत कागदपत्र उपलब्ध झाले नसल्याने त्यांना त्यांचे लेखी म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही. त्यामुळे झालेला विलंब माफ करण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्या विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही. उभय पक्षकारांतील वाद संपुष्ठात येण्यासाठी प्रतिवादींना एक संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

नि.क्र.२८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2022.03.17 17:18:33 +0530

(के. एस. सुर्यवंशी)

दिनांकः–१७.०३.२०२२ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.